“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


कार्यालय फोन : ०२२ – ४७४९ ८२५९ / ९८६७६ ७४८६४

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


।। पुस्तकं वनिता वित्तं परहस्तं गतं गतं ।।

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५


| क्रमांक २ | वर्ष : ४७ | जुलै–सप्टेंबर २०२५ |
|---|---|---|

**BOOK PACKET**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


**TO,**


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.


## महिलांचा स्नेह मेळावा : भगिनींस निमंत्रण

नेहमीचा श्रावणातला महिलांचा स्नेह मेळावा समारंभ यंदा जोगेश्वरी व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.

**जोगेश्वरी**

**तारीख :** शुक्रवार, १ ऑगस्ट २०२५

**स्थळ :** रामेश्वर मंदिर सभागृह, सरस्वती बाग, जोगेश्वरी (पूर्व)

**वेळ :** संध्याकाळी ५ ते ७

संघ कार्यकारीणी तर्फे

**शांता पालेकर ८८५००६६३८३**

**विद्या वागळे ९८९२३७९५२०**

**मुलुंड**

**तारीख :** मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५

**स्थळ :** **स्मिता दु. रेगे** यांचे **निवासस्थान,** ए – २०४, स्मिता बिल्डींग, कालीदास नाट्यगृहाजवळ, डॉ. आंबेडकर रोड, मुलुंड (प.), ४०००८०.

**वेळ :** संध्याकाळी ४ ते ७ ठाणे मंच कार्यकारीणी तर्फे

**सुरेखा पालेकर – ९०८२६ ६२०१९**

**स्मिता रेगे – ९१३६३ ७४७२५**

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही ३० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०२५ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलीफोन नंबर ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलीफोनवर कळवून आम्हांला उपकृत करावे.

१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची दखल घ्यावी.

आपणास माहित आहे ठाणे मंच वर्षभर विविध कार्यक्रम करून आपल्या ज्ञातिबंधवांना एकत्रित करत असतो. दिनांक ३० नोव्हेंबर रोजी सकाळी सर्व ज्ञातिबंधवांसाठी एक छानसा कार्यक्रम करण्याचे ठरवले आहे.

आपणाकडे एखादा कार्यक्रम माहित असल्यास किंवा आपण कार्यक्रमाचे आयोजन करत आसल्यास नि:संकोच कळवा. आमच्या बजेटमध्ये बसल्यास जरुर विचार करू.

**संपर्क :**

**सुरेश पालेकर–८९२८८५०१९३ राजेश दिवेकर–९६१९३६२४६०**

**गिरीश रेगे–९९२२१६८७२५**

## संपादकीय

### आपली मुखपत्रिका

परवाचीच गोष्ट! आपल्या NKGSB संघाच्या वरिष्ठ प्रभृतींनी गाढ चिंता व्यक्त केली आणि ती स्तुत्यही आहे. त्यांचे विचार पटण्यासारखे आहेत. त्यांनी आपले विचार मांडताना म्हटले की आपली कारवार, सदाशिवगड, माजाळी, अंकोला येथील गौड सारस्वत ब्राह्मण समाजातील कुटुंबे हाताच्या बोटावर मोजण्याइतकी कमी होत चालली आहेत. खुद्द कारवारमध्ये आजच्या घडीला ६ ते ७ कुटुंबेच तग धरून आहेत.

एके काळी प्रत्येक कुटुंबात साधारणत: ५ ते ६ मुले व्हायची. समाज फोफावत होता. कारवार प्रांतात सर्वत्र वागळे, वाघ, नाडकर्णी, कुलकर्णी, कसबेकर, गायतोंडे, वर्टी, आरस, तेलंग, मुजुमदार अशी वर्दळ असायची. नंतरच्या पिढीत गेल्या ३०-४० वर्षात हाच कुटुंबाचा आकडा रोडावत १ मुलगी वा १ मुलगा किंवा १ मुलगी + १ मुलगा असा मर्यादित होऊन घसरला! त्यांनी सुद्धा उच्च शिक्षणासाठी परदेशात गमन केले. ह्यातील बहुतेक कुटुंबे मुंबई, पुणे, ठाणे इत्यादी ठिकाणी पसरली. नोकरी निमित्ताने इतर शहरात स्थिरावली. ह्या काळात मुलाने परदेशातच लग्न करून तो तिथेच स्थायीक झाला तर मुली आंतरजातीय विवाह करून कारवारपासून फारकत घेऊन पसार झाल्या!

आई वडिलांना मात्र कारवारचे अप्रुप! त्यांना जुने दिवस आठवले की ते अधूनमधून कारवारला येत. आठवडाभर राहून सुके बांगडे, त्रिफळा, वटाची सोल तसेच मानकुराद, इर्शाद वगैरे आंबे खाऊन पुन्हा मुंबईला प्रस्थान करीत. अशा परिस्थितीत आपली अवस्था पारशी समाजासारखी रोडावत जाते की काय अशी भिती वाटू लागली आहे. त्यातल्या त्यात मंगेशी, शांतादुर्गा (कवळे)च्या दर्शनाला मात्र ही मंडळी साधारण वर्षा दोन वर्षाने जातात. ही पिढी असेपर्यंत हे चालू राहील हे निश्चित! बरे, नवीन पिढी संपूर्ण इंग्रजीत शिकलेली. त्यांना 'मराठी' वाचनाची संवय किंवा आवड नसल्याने आपली मुखपत्रिका आता बहुतेक साठीच्या आसपासचेच वाचक वाचताना दिसतात.

गेल्या दोन-अडीच वर्षांपासून मी प्रसाद मोहन कसबेकर मुखपत्रिकेचा संपादक म्हणून काम बघतोय. माझ्या आधी श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी उर्फ DNN (ज्यांना मी गुरुस्थानी मानतो) त्यांनी जवळजवळ ४५ वर्षे ही कामगिरी उत्तमरित्या पार पाडली हे तुम्ही सर्वजण जाणताच! आता वयोमानापरत्वे तसेच थोड्या प्रमाणात प्रकृति स्वास्थ्याच्या दृष्टीने त्यांनी संपादक पदाचा राजिनामा दिला. NKGSB संघ नवीन संपादक शोधत होते. अशा वेळी नेमका मी संघात टपकलो! मी स्वत:हून ही जबाबदारी स्वीकारण्यास तयार असल्याचे कमिटीला सांगितले व त्यांनाही आयता संपादक मिळाल्याचा आनंद झाला असावा! मी मन लावून DNN यांच्याकडून धडे घेतले. जुन्या मुखपत्रिकांची उजळणी केली, अभ्यास केला, विषय समजून घेण्याचा प्रयत्न केला व कामाला जुंपून घेतले.इथे एक गोष्ट वाचकांनी लक्षात घ्यायला हवी की फक्त संपादकीय लिहून हे काम संपत नाही तर पान नंबर १ पासून पान नंबर ३२ किंवा ३६ पर्यंत कुठे कुठला 'मॅटर' घालावा, कुठला लेख कुठे योग्य प्रकारे घालावा, किती जागा द्यावी, जाहिराती कुठे मांडाव्या तसेच देणग्या, निधन वगैरे व्यवस्थित लिहिले जाईल याकडे बारकाईने बघावे तसेच प्रूफ रिडींगही करावे (ह्यासाठी व्याकरणाखातीर मी



नेहमी DNN यांना शेवटचे प्रूफ दाखवतो व नंतर त्यांनी सुचवलेल्या दुरुस्त्या करून पूर्ण 'मजकूर' टायपिंगला देतो.)

मराठीतील ऱ्हस्व, दीर्घ नीट बघावे, मसुदा टायपिंगला दिल्यावर त्यातील बारीकसारीक चुका शब्द शब्द नीट बघाव्या, सुधाराव्या व शेवटी मुखपत्रिका प्रिंटींगला द्यावी. हे सर्व होईस्तोवर आमच्या डिलीवरी एजंटशी संपर्कात रहावे, वेळेवर तो लेबल्स लावून स्टँप मारून पोस्टात २६ ते २७ तारखेपर्यंत टाकतोय ते बघावे व शेवटी अशा मुखपत्रिकेची प्रसुति झाल्यावर १० तारखेपासून २५ तारखेपर्यंत असंख्य फोनना सामोरे जावे की ज्यांना 'अजून मुखपत्रिका मिळालेली नाही!' मग त्यांना एक्स्ट्रॉ प्रती पाठवायची व्यवस्था करावी. ज्ञातिबांधावांचे पत्ते बदलले असतील, चुकीचे असतील तर तसे ऑफीसला कळवावे. इतकं सर्व करून काही ज्ञातिबांधवांकडून घरचा अहेर घेत रहावा! मला बरे वाटते ह्यातून बरेच शिकायला मिळते. पण कौतुकाचा शब्दही कुणाकुणाकडून येतो, नाहीच असे नाही!

अशा वेळी कौतुक वाटते ते DNN यांचे! त्यांनी ४५ वर्षे मुखपत्रिका लिहीत कशी काढली असतील! त्यामुळे मी फक्त आपले काम प्रामाणिकपणे करत रहाण्याचा निर्धार पक्का केला आहे!

**– प्रसाद कसबेकर**

## प्रकाश झोत-१

### पद्मश्री पद्मजा फेणाणी जोगळेकर यांना 'अरुण दाते कला सन्मान' पुरस्कार



चतुरस्त्र गायिका व संगीतकार पद्मश्री पद्मजा फेणाणी जोगळेकर यांना यंदाचा 'अरुण दाते कला सन्मान' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. संगीत तज्ज्ञ रामूभैय्या दाते स्मृति समिती तर्फे ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांच्या हस्ते हा पुरस्कार मे महिन्यात प्रदान करण्यात आला. त्या वेळी पद्मजा मॅडम यांनी नमूद केले की अरुण दाते यांनी मुलायम स्वरांनी 'शतदा प्रेम करावे' हा मंत्र रसिकांच्या मनावर जागवला व ते स्वत: ही शब्दश: जगले. दाते यांनी माझ्या आयुष्यात मला मोलाची साथ दिली. अशोक पत्की यांनी माझ्या पहिल्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी एकाच दिवशी बारा गाणी बसवून एकाच टेकमध्ये गाऊन घेतली होती. असा चमत्कार करणाऱ्या पत्की यांच्या हस्ते मला हा पुरस्कार मिळाला यामुळे माझा आनंद द्विगुणित झाला. पद्मजा मॅडम या शास्त्रीय व उपशास्त्रीय अशा दोन्ही प्रकारांतून तेवढ्याच ताकदीने गातात. त्यांनी आजवर अनेक उत्तम कवितांना सुबद्ध चाली लावून त्यांच्या अनेक ध्वनिफिती काढल्या आहेत.

पंडित जसराज, पंडित रामनारायण, पंडित हृदयनाथ मंगेशकर हे त्यांचे गुरुवर्य. 'स्वरचंद्रिका' या माध्यमातून त्यांनी अनेक देशविदेश दौरे करून नावलौकिक मिळविलेला आहे. २००१ साली त्यांना पद्मश्री हा पुरस्कार देऊन भारत सरकारने त्यांच्या कलागुणांची दखल घेतली.

## प्रकाश झोत–२



**Dr Samir V Kamat**
New DRDO Chief

Dr. Samir V Kamat, A Proud GSB basically from our Goa now is present Chairman of India's prestigious DRDO (Defence Research & Development Organisation), We all Gaud Saraswath Brahmins are really Proud to have our community member in such a prestigious position of Country who made our entire community Proud.

## प्रकाश झोत–३

### युवा प्रजेला कुर्निसात. . . .

**कला व मनोरंजन, उद्योग, व्यवसाय, समाजसेवा, कायदा व प्रशासन, विज्ञान व संशोधन, क्रिडा या क्षेत्रांमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या २० युवा गुणवानांना यंदा 'लोकसत्ता तरुण तेजांकित' पुरस्कारांनी गौरवण्यात आले. चाकोरीबाहेरची दिशा धरणाऱ्या या गुणिजनांच्या कार्याची दखल 'लोकसत्ता' ने नेहमीच घेतली आहे.**

### जैवतंत्रज्ञानातील विकासवाट - डॉ. सलोनी वाघ यांचे योगदान



(केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरींच्या हस्ते पुरस्कार घेताना डॉ. सलोनी वाघ.

गेल्या काही वर्षांत वैद्यकीय क्षेत्रात, औषधनिर्मिती क्षेत्रात भारत झपाट्याने प्रगती करत आहे. विशेषतः करोना काळात लसनिर्मितीची भारताची ताकद अधोरेखित झाली. मुंबईतील डॉ. सलोनी वाघ व्यवस्थापकीय संचालक असलेली सुप्रिया लाइफसायन्सेस ही कंपनी वेगवेगळ्या आजारांसाठीची विशिष्ट औषधे तयार करते. अँटिहिस्टामाइन्स, दमा यांसारख्या आजारांवर विशिष्ट औषधे, उत्पादने या कंपनीने तयार केली आहेत. औषध निर्मितीसाठीची रसायने आणि सक्रिय औषधी घटकांसाठी कंपनी ओळखली जाते. सलोनी औषधांमध्ये होणारे बदल लक्षात घेऊन त्यासबंधी नवी औषध उत्पादने, क्लिनिकल चाचण्या करते. ही कंपनी जगभरातील ८६ देशांमध्ये सेवा पुरवते. सरकारी पाठिंब्यासह कंपनीने औषधनिर्माण क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे. भारतीय औषध उद्योगाच्या वाढीसाठी ती सतत प्रयत्नशील असते, कंपनी नवीन उत्पादने  विकसित करण्यासाठी आणि बायोटेक एपीआयमध्ये विस्तार करण्यासाठी संशोधन आणि विकास या घटकांसाठी आता गुंतवणूक करत आहेत.

औषधनिर्मिती क्षेत्रातील कामगिरी लक्षात घेऊन डॉ. सलोनी वाघ हिला २०२३ मध्ये फोर्ब्स इंडियाच्या आयकॉनिक महिलांच्या यादीत स्थान देण्यात आले. सुप्रिया लाइफसायन्सेसचे आता लक्ष्य चीन, युरोप, अमेरिकेसारख्या विकसित बाजारपेठांकडे आहे. नवे उत्पादन विकसित करणे, जैवतंत्रज्ञान सक्रिय औषधी घटकांच्या विस्तारासाठी संशोधन आणि विकासावर गुंतवणूक करण्यात येत आहे. देशात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महिलांचा सहभाग फार कमी असताना औषधनिर्मितीसारख्या क्षेत्रात डॉ. सलोनीचे काम नक्कीच प्रेरणादायी आहे.






## डॉ. सतीश वामन वाघ

(सुप्रीया लाईफ सायन्सेस उद्योग समूहाचे मालक)

डॉ. सतीश वामन वाघ (सुप्रीया लाईफ सायन्सेस उद्योग समूहाचे मालक) यांना प्रमुख पाहुणे म्हणून गोरेगांव पूर्व पहाडी येथील शनी मंदिराच्या ७८ व्या वर्धापन दिना निमित्त आमंत्रित केले होते. त्यांच्या बरोबर श्री. ठाकूरजी (उपाध्यक्ष, भाजप-महाराष्ट्र राज्य) व श्रीमती विद्या ठाकूर (आमदार, गोरेगांव पूर्व) यांचीही उपस्थिती होती.

ह्या प्रसंगी डॉ. सतीश वामन वाघ यांनी १० लाख रुपयांची भरघोस देणगी या शनी मंदिराच्या नुतनीकरणासाठी तसेच सुशोभीकरणासाठी दान केली.





### डॉ. आसावरी भट यांना श्री समर्थ विद्यापीठ, सातारा यांच्यातर्फे श्री समर्थ शिष्य योगीराज कल्याणस्वामी पुरस्कार

पारले येथील डॉ. आसावरी विवेक भट (माहेरच्या डॉ. विजया माधव देसाई) या व्यवसायाने डॉक्टर. वयाच्या पन्नासाव्या वर्षी नोकरी सांभाळून त्यांनी पतीसह संस्कृतचा अभ्यास सुरू केला. बी. ए. च्या परीक्षेत उभयतांनी पहिले दोन क्रमांक पटकावले. नंतर उभयतांनी एम्. ए. ची परीक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण केली. डॉ. भट यांनी नंतर संस्कृत विषयातच डॉक्टरेट मिळविली.

दोन विभिन्न क्षेत्रांत त्या डॉक्टर आहेत. वयाची पंचाहत्तरी ओलांडल्यावर त्यांनी दासबोधाचा अभ्यास सुरू केला. श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या स्मृत्यर्थ प.पू. भगवान श्रीधरस्वामी यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड संचालित श्री समर्थ विद्यापीठ, सातारा यांच्या वतीने भरविण्यात येणाऱ्या प्रत्येक परीक्षेत त्यांना विशेष प्राविण्य मिळाले. शेवटच्या 'प्रज्ञा' परीक्षेतही त्यांनी उज्वल यश संपादन केले. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात भरलेल्या एका खास समारंभात 'जय जय रघुवीर समर्थ'च्या गजरांत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

व्यासंगी डॉ. भट यांचे अभिनंदन. ***



## माजाळीतील गुंडांची शाळा



नाव ऐकून चमकलात ना. माजाळीतील गुंड लोकांच्या करीता शाळा अशी समजूत झाली ना? राज कपूरच्या जिस देशमे गंगा बहती है किंवा व्हि. शांताराम बापूंच्या दो आंखे बारह हाथच्या धर्तीवर गुंडांच्या हृदय परिवर्तनाचा प्रयोग असावा असे वाटले असेल ना?

नाव नीट वाचा. गुंडाची शाळा. गुंडांची नव्हे.

कै. श्री. गुंडा वागळे (गुणेश्वर कृष्णराव वागळे) यांनी १९३७ मध्ये एका छोट्याश्या खोपटात हे रोपटे लावले. आज ८७ वर्षानंतर देखील ते तगून आहे.

आता त्याचे नामकरण झाले आहे युनियन हायस्कूल. चांगले आहे. पण आमच्या सारख्या जुन्या लोकांच्या करिता अजून देखील गुंडांची शाळाच.

दूरदृष्टीच्या कै. श्री. गुंडा वागळे यांना माझे त्रिवार वंदन.

**– विजय सावंत**

## *मुखपत्रिका*

*मुखपत्रिका एक सुंदर मनोहारी डहाळी*
*नव्या नव्हाळीनं, पालवीनं नटलेली सदैव हिरवीकंच*
*मुखपत्रिका नटली, सजली नाना विषयांनी*
*दिधले संस्कार, विचारधन सहस्त्रकरांनी*
*लेख-कविताने सदैव मुखपत्रिका लगडली*
*ऊन सोसुनि दिली ज्ञातीला सावली*
*सांज सकाळच्या रंगात ती नटली*
*संघ-सोसायटीच्या मखरी शोभली ........जय हो । जय हो ।.....*
*अशीच प्राजक्तासम मोहरेल पानोपानी*
*बकुळीसम दरवळेल सुगंध मनोमनी*
*कर जोडोनिया करी मंगेशाला प्रार्थना*
*हिला कर शतायुषी, हीच मम कामना ।*

*-कुंदा र. देसाई*

## माझे पप्पा



माझे पप्पा श्रीयुत लक्ष्मीकांत (भाऊ) वामन वागळे, वागळे वाडा, बाड ह्यांचा जन्म ६ नोव्हेंबर १९३४ रोजी बाड येथे झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण तेथील न्यू हायस्कूल येथे झाले. एसएससीनंतर टायपींग हेच करीयर करण्याचे ठरवून त्यांनी त्यासाठी आवश्यक त्या सर्व परीक्षा यशस्वीपणे पूर्ण केल्या. तत्पूर्वी कारवारमध्ये वाचनालयाची आवश्यकता भासत होती. त्यामुळे वागळे वाचनालयाची मराठी व इंग्रजी भाषेतील निवडक पुस्तकें ठेवून सुरुवात केली. ते वाचनालय यशस्वीपणे १२ वर्षे चालविले. त्यानंतर त्यांनी श्री साईनाथ इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स ह्या नावाने टायपींग क्लासची सुरुवात केली. ती त्यांच्या वयाच्या ८० वर्षांपर्यंत अत्यंत यशस्वीपणे चालविली.

त्यांच्या टायपींग क्लासमध्ये इंग्रजी, कन्नड व हिंदी (मराठी) अशा भाषेतून शिकविले जात असे. कर्नाटक राज्यात त्यांच्या इन्स्टिट्यूटमधून प्रत्येक वर्षी टायपींग परीक्षेमध्ये न चुकता रँक येत होती. ह्या प्रकारे कारवार व परिसरामध्ये ''वागळे टायपींग क्लास'' ह्या नावाने ते प्रसिद्ध होते.

कालांतराने १९५६ साली राज्य पुनर्रचना झाली व त्यानंतर आपला समाज गांव सोडून मुंबई व अन्यत्र स्थलांतरीत झाला. परंतु माझे पप्पा इथेच राहून बाडचे घर, घरातील सर्व देवकार्य सांभाळून त्यांनी आपला टायपींग क्लास उत्तरोत्तर प्रगतीपथावर नेत अगदी यशस्वीपणे चालविला. पुढे वयोमानानुसार त्यांनी टायपींग क्लास बंद केला.

ह्या टायपींग क्लासवरच त्यांनी आपले घर-संसार, मुला-बाळांची लग्ने सर्व काही यशस्वीपणे पार पाडले. आपला समाज कारवार सोडून अन्यत्र स्थलांतरीत होत असताना टायपींग क्लास सारखा स्वतंत्र व्यवसाय करून यशस्वीपणे जगता येते हे त्यांनी दाखवून दिले.

त्यांच्या वयाच्या ९१ व्या वर्षी ऑक्टोबर ५ तारखेला (नवरात्रीच्या तिसऱ्या दिवशी) तारखेला त्यांचे देहावसान झाले. आता आम्हां सर्वांस त्यांची फार उणीव भासते. सतत आठवण येते. त्यांच्या स्मृतीला शतश: नमन!

– राजेंद्र लक्ष्मीकांत वागळे

९८४०१५६५३९




# Mangsidesh Investment Pvt Ltd

MSIPL We Make People Richer

**AMFI-Registered Mutual Fund Distributor**


402, Business Point, Paliram Road, Off S. V. Road, Behind Brahma Kumari Hosp., Andheri (West), Mumbai 400 058

Contact No. 022 4233 2300 to 2399, +91 91672 20380

## Invest in Your Future with Confidence

**Benefits to Invest in Mutual Fund:-**

1. Diversified portfolio to manage risk
2. Professional fund management expertise
3. Variety of asset classes (equity, debt, hybrid, index, ETFs)
4. Liquidity and flexibility
5. Potential for higher long-term returns




**Grow your wealth with our expertly managed Mutual Funds**

A little every month grows to something significant over time..

Invest Rs. 1,000/- Per month & get ..

| Investment Years | Total Investments | Growth rate 8% | Growth rate 12% | Growth Rate 15 % |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 275,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |

Indian Equity market has given average 16% returns in last 33 years

Mutual Fund Investments are subject to market risk, Read offer documents carefully before Investing.

Activat
Go to Se

# 'गेले ते दिन गेले' - आमची सीता चाळ

तो काळ साधारण १९५५ ते १९६२ चा असावा.

माझे बालपण जास्त करून माझ्या आजीकडे म्हणजे आईच्या आईकडे (दुर्गाबाई दत्तात्रय वर्टी) यांच्याकडेच गेले. माझ्या आजीला मी आई म्हणायचो. कारण माझे दोन्ही मामा व मावश्या आजीला आई म्हणत असत. माझ्या आईला अंबूताई! मी पण त्याच नावाने म्हणू लागलो. माझी आजी सीता चाळीत रहायची. अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी अशा पाच चाळी टोपीवाल्यांनी त्या मधल्या आळीत बांधल्या होत्या. त्यातली आमची सीता चाळ तशी पॉश! कारण बाहेरचा व्हरांडा कॉमन असला तरी प्रत्येक घरात संडास व प्रशस्त बाथरूम होते. म्हणायला चाळ होती. कारण कॉमन व्हरांडा! ह्याच बोळात (आमच्या एका बाजूला) पारशांची अग्यारी होती. तर दुसऱ्या बाजूला बावडी होती. पाणी मात्र सकाळी ५.३० ते ६.३० च्या दरम्यान यायचे. ते आजी पिंपांमध्ये भरून ठेवत असे. आंघोळीला बंब होता. त्यात खालून बदामी कोळसा घालून पाणी तापवत होतो.

आजी  पहाटे पाणी भरताना जो मरफीचा मोठा रेडिओ होता त्यावर मुंबई 'ब' हळू आवाजात लावायची. आम्ही  झोपेत ती गाणी कानात भरत असू. ''हरी हरी  हरी हरी सुमीरन करो'', ''क्षणभर उघड नयन देवा'', ''अजून नाही जागी राधा'', ''देव माझा विठू सावळा'' वगैरे. आजीच्या घरी दिवसभर कोणी ना कोणी नात्यातले येत असत. माझी पणजी कारवारहून इथेच येऊन राहिली होती. तिचे पाय गोरे गोरे व इतके मऊ  होते की ती मला चेपून द्यायला सांगायची व मला ते काम फार आवडायचे. मी तेव्हा ७-८ वर्षाचा होता.

सीता चाळीची सकाळ किलन् लेनच्या दिशेने आलेला वासुदेव असायचा. तो मोरपिसाचा मुकुट घालून टाळ वाजवत 'वासुदेव आला' करत दक्षिणा घेत यायचा. मागून एका मागे एक विक्रेते आवाज देत येऊन जात जे रात्री १० वाजेपर्यंत! वासूदेवामागे ''जाडा मीठ''ची गाडी व त्याची आरोळी. नंतर ''चमक'' पावडर घ्या चमक पावडर-भांडी लादी मोरी धुण्यासाठी'' असं ओरडत चमक पावडरवाला येऊन जायाचा. आम्ही दुसऱ्या मजल्यावर रहायचो. शेजारचे कुणी बोलवले तर तो वर येऊन पावडर देऊन जायचा. मग यायची'म्हावरा घे' वाली मासे वाली. ही मात्र सगळ्यांच्या दारात वरपर्यंत मासे विकायची. आमच्या चाळीत सर्व बहुतेक सारस्वत रहात त्यामुळे मासे सर्वांचे प्रिय खाद्य! नंतर एका लोखंडी गाडीत शंकराची मूर्ती ठेवून ताशे वाजवत शंकराची स्वारी येऊन जायची. त्यामागे ''कांदे बटाटे वाला'' काय भारदस्त आवाज होता त्याचा. मग एक फकीर यायचा. ''पिला दो पिला दो प्रेमी का प्याला, करो पूरी आशा मेरे साईबाबा'' टीर्र् टडक् असं काहीसं वाजवत तो यायचा. तो गेला तसाच ''टाकी लावून घ्या टाकी'' म्हणत टाकीवाली यायची. त्या मागे 'रद्दी पेपॉर'' करत रद्दीवाला फिरायचा. मग एक आवाज यायचा ''कोण तो तांबा पितळची भांडी घेतो.''मी बुचकळ्यात पडायाचो. हा असं का विचारतो. मग कळलं तो म्हणायचा ''मोडतोड तांबा पितळची भांडी घेतो.'' त्यामागून आडवी टोपीवाला 'कलोय वाला कलोय'' यायचा. हा सर्वांच्या दारा समोरून जायचा. त्या आधी डबेवाले ऑफीसचे डबे घेऊन जात. पण त्यांचा आवाज नसायचा. नंतर मात्र एक गंमत व्हायची. 'ए जुना बूट, ए चपलांचे नी बूट'' म्हणत चांभार फिरायचा. माझी पणजी (कारवारहून आलेली) खिडकीत बसून तो आवाज ऐकायची. एकदा म्हणाली 'अगो, तॉ ए सुण्यागू' किते म्हणता हांगा मुंबयत सुण्यागू बी विकतात गो?' 'ए सुण्या गू' असं ऐकू आलं तरी ते होतं 'ए जुनाबूट'!

''तान्हा दुधाची बाटली'' काय ''गाईला चारा दे'' काय सर्व सर्व झालं की दुपारच्या भर उन्हात वरती दारावर यायचा 'नॉयलॉन रिबाईन वाला रिबाईन' तरण्या मुली मग रिबीनी बघायला जमत. तो त्याच्या पेटीतून रंगबेरंगी रिबीनी दाखवायचा. तसेच काचेच्या बांगड्या विकणारे यायचे त्या मागे.



''भांडी घ्या भांडी'' म्हणत जुन्या कपड्यांच्या बदल्यात तपेली, स्टेनलेसचे डबे वगैरे विकणारी यायची. जरा दुपार उलटली की ''बटाटा वडाऽऽऽ आआआऽऽ फाटक यांचा गरम गरमऽऽ बटाटा वडा चौकोनी डबा व हातात भोंगा घेऊन बटाटेवडेवाला ४ ते ५ च्या दरम्यान टपकायचा. वडे खाऊन होईस्तो ''चमेली-आबोली' वेण्या घेऊन वेण्या विकणारा येत असे. पण त्यासाठी खाली जावे लागे. तो वर येत नव्हता. असे नाना प्रकार! त्यात ४ ते ६ आमचे मुलांचे क्रिकेट चालायचे. कुणी पापड, वड्या सुकायला जुन्या साडीला चार दिशेने दगड लावून ठेवली असतील तर आमच्या खेळाचा खोळंबा व्हायचा. हा सर्व धुमाकूळ रात्रीपर्यंत चालायचा. मग रात्री निवांत ९-१० वाजता यायचा 'माय पे' म्हणजे मलायी कुल्फीवाला. त्याची कुल्फी घेणारे तळ मजल्यावरचे म्हात्रे, कंटक हे रोजचे गिऱ्हाईक!

याशिवाय काही इतरही उपद्रवी प्राणी येत. एकदा एक भिकारी वर आला. मी गॅलरीत खाली बघत उभा होतो. आमचा शेवटून दुसरा ब्लॉक होता. त्या भिकाऱ्याने मला विचारले, ''बाळ, बाजूला कोपऱ्यात कोण रहातात?'' मी  प्रांजळपणे सांगितले, ''घाणेकर'' बस! तो त्यांच्या दारात येऊन म्हणू लागला ''घाणेकर घाणेकर बाहेर या. या गरीबाला काही दान करा.'' त्यांचा तिशीतला तरुण मुलगा बाहेर आला व त्याने भिकाऱ्याला हाकलावले व मला म्हणाला, 'पंकज, जरा इकडे ये.' मी गेलो.'त्याला आमचं नाव कुणी सांगितलं?' मी म्हणालो 'मी सांगितलं त्याने विचारलं म्हणून.' त्या बरोबर सुरेशने  मला अशी एक गालफडात हाणली, मी अजून विसरलेलो नाही! ''डोंबाऱ्याचा खेळ'', ''फटके मारणारी अंबाबाई'' हे मध्ये मध्ये टपकायचे. ते दिवस आठवले की पुन्हा लहान व्हावे असे वारंवार वाटते. गुरुवारी आमच्या आळीबाहेर कोळशाची वखार होती तेथे जुनं साईधाम होते. साईबाबांची सुंदर मूर्ती बघून छान वाटायचे. तिथे शिरडीच्या आरत्या व्हायच्या. नंतर फुटाणे व मोठ्या तिळगुळाचा नैवेद्य असायचा. तिथे बसायला जागा नव्हती. गर्दीतच उभ्या उभ्या दर्शन व्हायचे. नंतर नवीन साईधाम चिंबुरकरांनी उभे केले. पण हे साईधाम अजून तसेच आहे. कोळशाची वखार गेली. विजय हेअर कटींग सलून गेले, गुप्ता चना भंडार गेले, ब्लाऊज शिवणाऱ्या शिंप्याचे दुकान गेले. आता मोटारींच्या स्पेअर पार्टसची दुकाने झाली आहेत.

गोखले  हायस्कूलची  मुले  आमच्या आळीतून जायची. त्यांची परिक्षेच्या वेळी एक धारणा होती की तुळशीचे पान जीभेवर ठेवले तर पेपर सोपा जाईल. झाले. मग सर्व मुले आमच्या तळमजल्यावरच्या यमुताई बोरकरांच्या तुळशीच्या कुंडीतली पाने तोडत असत. यमुताईंची इथे बोंबाबोंब चालू असे! आमचा एक पाण्याचा पाईप आमच्या दुसऱ्या मजल्यावरून खाली जायचा. तिथे चवाथे रहायचे. त्यांच्या समोर तो उघडा असायचा. नेहमी एक भटजी आमच्या गल्लीतून निघाले की आम्ही मुले त्या पाईपमधून वरून म्हणायचो ''भटमाम, पंचम कॅन्ना'' तो आवाज असं वाटायचं की चवाथेंच्या घरून आल्यागत! काय तो भटमाम चिडायचा. चवाथेंना अव्वाच्या सव्वा शिव्या घालायचा. आम्ही वरून गुपचुप तमाशा बघायचो!

आमच्या आळीतून किलन लेनच्या बाजूने बाहेर पडताच समोर ''रामजी भाईंचे मिरची, कोथिंबीर, कडीपत्ता, आलं चे दुकान. तेव्हा १ आण्यात संपूर्ण मसाला मिळायचा!

ते नाक्यावरचे इराणी रेस्टॉरंटही गेले. पैं ची लॉंड्रीही गेली, आजीची तपकीर देणारी पानाची गादीही गेली व तो बिस्कीटवालाही गेला. नाही गेलंय ते किलन लेनमधलं पोस्ट ऑफीस! अजून तस्संच आहे. हल्लीच एकदा आत गेलो व तो गोंदाचा जुना वास घेऊन आलो! असो! ही जंत्री बरीच मोठी आहे. आता आजी पण गेल्या, माधव मामा पण गेले, सुरेश घाणेकरही गेला, यमुताईही गेल्या.

आता त्या बोळातून गेल्यास एक भयाण शांतता मात्र मन सुन्न करते.

– प्रसाद कसबेकर

***

## एक अत्यंत समर्पक आणि अंतर्मुख करणारा विषय
## ‘‘मैत्रीमधील मंदी’’

मी अलीकडे हार्वर्ड बिझनेस रिव्ह्यूच्या फेब्रुवारी अंकात एक अत्यंत विचारप्रवर्तक लेख वाचला आणि तो थेट हृदयाला जाऊन भिडला. या लेखात "Friendship Recession" म्हणजेच मैत्रीमधील मंदी कशी आपल्या दैनंदिन व्यवहारात शिरकाव करत आहे, हे अतिशय प्रभावीपणे मांडले आहे.

American Perspectives Survey नुसार, १९९० पासून अमेरिकन प्रौढांमध्ये ‘‘एकही जवळचा मित्र नाही’’ असे सांगणाऱ्यांचे प्रमाण चारपट वाढून १२% वर गेले आहे, तर ‘‘१० किंवा अधिक जवळचे मित्र आहेत’’ असे सांगणाऱ्यांचे प्रमाण एकतृतीयांशाने कमी झाले आहे.

माझं मत आहे की जर भारतातील शहरी भागात असाच एखादा सर्व्हे केला, तर तसाच काहीसा कल दिसून येईल. आपल्याकडे ओळखी वाढत आहेत, पण खरे ‘मित्र’ कमी होत आहेत. पूर्वी अशी वेळ होती की आपण नवीन शहरात असलो, तरी एखाद्या बारमध्ये गेलो, काऊंटरवर बसलो आणि ओळखीच्या, अनोळखी मित्रां सहज गप्पा रंगल्या असं सहज घडलं असतं.

पण आजकाल अनेकजण एकटे टेबलवर बसतात, गर्दीकडे पाठ करून. अमेरिकेतील एका अलीकडच्या सर्व्हेप्रमाणे, एकटे जेवणं हे प्रकार मागील दोन वर्षात २९% ने वाढले आहे. Stanford University तर आता विद्यार्थ्यांना सामाजिक जीवन उद्देशपूर्वक रचायला शिकवण्यासाठी "Design for Healthy Friendships" नावाचा अभ्यासक्रम चालवते.

हे सगळं फक्त एक सामाजिक बदल नाही तर एक सांस्कृतिक संकट आहे. मैत्रीसाठी वेळ काढणं ही केवळ लक्झरी राहिलेली नाही; ती आता एक प्राथमिकता असली पाहिजे.आपण आपला वेळ कुठे घालवतो, कोणामध्ये गुंतवतो, हे सर्व झपाट्याने बदलतंय. एकटेपणा हा आता निवड नाही, तर एक नवा नॉर्म बनत चाललाय. आणि जर योग्य पद्धतीने वापरला गेला नाही, तर हा एकटेपणा मित्र न बनवण्याचीच नाही, तर मैत्री टिकवण्याचीही क्षमता गमावून बसण्याचं कारण बनतो. जर आपण जागरूकपणे आपल्या प्राधान्यक्रमात मैत्रीला स्थान दिलं नाही, तर ‘‘संबंध’’ – हा आपल्या आनंदाचा आणि आरोग्याचा सर्वात महत्त्वाचा स्रोत – आपल्याला नकळत गमवावाच लागेल.

पूर्वी जिथे नैसर्गिकरीत्या मैत्री फुलवायची अशा संस्था – धार्मिक कार्यक्रम, क्लब्स, क्रीडा संघटना, रोटरीसारख्या स्वयंसेवी संस्था – या आता संख्येने आणि प्रभावाने दोन्ही प्रकारे कमी होत चालल्या आहेत. आता आपण आधीपेक्षा अधिक स्वत:मध्ये गुंततोय – सोशल मीडिया, कुटुंबातील जबाबदाऱ्या, पालकत्व, पाळीव प्राणी यांच्यात. हो, पाळीव प्राणी! माझ्याच अनेक मित्रांनी भेटीला येणं केवळ पाळीव प्राण्यांच्या कारणास्तव टाळले आहे. आज मैत्री ही आपल्या दैनंदिन आयुष्याचा अविभाज्य भाग राहिलेली नाही. ती आता इतर सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर उरलेल्या वेळात जमली तर जमली, अशा स्वरूपात आली आहे. हे सगळं असूनही, मैत्रीचे महत्त्व अधोरेखित करणारे भरपूर संशोधन उपलब्ध आहे.



Bonnie Ware या हॉस्पिस परिचारिकेच्या The Top Five Regrets of the Dying" या प्रसिद्ध पुस्तकात एक अत्यंत हृदयस्पर्शी विधान आहे.– "I wish I had stayed in touch with my friends." मला वाटतं, मी माझ्या मित्रांशी संपर्कात राहिलो असतो तर बरं झालं असतं. संशोधन सांगतं की– "Social isolation म्हणजे सामाजिक एकटेपणा हा हृदयरोग, डिमेन्शिया आणि मृत्यूचा धोका वाढवतो. हे रोज १५ सिगारेट पिण्याइतकं धोकादायक असू शकतं.’’ मैत्री ही मानसिक, शारीरिक आणि भावनिक आरोग्य सुधारते. Harvard University च्या ८० वर्ष चाललेल्या प्रसिद्ध अभ्यासात हे स्पष्ट सांगितलं गेलं की,‘‘आपल्या आयुष्यातील आरोग्य व आनंद याचा सर्वात मोठा भविष्यवक्ता (predictor) म्हणजे तुमचं धन किंवा व्यावसायिक यश नव्हे, तर तुमचे निकटवर्तीय संबंध आणि मैत्री आहे.’’

Survey Centre on American Life च्या अहवालात एक मूलभूत सत्य आहे. More Friends equals more life satisfation." ‘‘अधिक मित्र = अधिक आयुष्यात समाधान.’’ जसं गुंतवणूक वाढण्यासाठी वेळ लागतो, तसंच मैत्रीसुद्धा!

ती एक दिवसात होत नाही – तिच्यासाठी लागतो वेळ, प्रयत्न आणि मनापासूनचा सहभाग.

माफ करा, विसरून जा, गरज वाटली तर माफी मागा,<br>
फोन करा, बिल भरा, ट्रिप प्लॅन करा, एखादं गिफ्ट द्या,

स्मृती निर्माण करा – जरी ती आठवण केवळ स्वत:साठीच असेल तरीही!

शेवटी मिर्झा गालिब यांचा हा शेर शेवट म्हणून खास – ‘‘दोस्ती के साथ जी लेने का<br>
मौका दे दे ऐ खुदा.. तेरे साथ तो मरने के बाद भी रह लेंगे..’’

मित्र व्हा आणि सदैव आशीर्वादित राहा.

---

*।। एको हि रुद्रो*<br>
*न द्वितीताय तस्थुः।।*<br>
*।। श्री गुरुभ्यो नमः।।*




Pranaam Samaj Bandhavs,

We are pleased to inform you that the Chaturmas 2025 of Shree Saunsthan Gaudapadacharya Kavale's 77th Mathadhipathi, Shreemat Shivanand Saraswati Swami Gaudapadacharya, will commence from 10th July 2025 at Shree Saunsthan Gaudapadacharya Walkeshwar Shree Kavale Math.

We wholeheartedly invite all devotees to attend in large numbers and receive the divine blessings of Shree Bhavani Shankar Panchayatan Dev and Shree Swamiji during this auspicious period.

- Shree Saunsthan Gaudapadacharya,<br>
Walkeshwar Shree Kavale Math

***

## एज्युकेशन सोसायटी – गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षीसे दिली जातात. बक्षीसाची पात्रता पुढीलप्रमाणे

| परीक्षा | किमान पात्रता |
|---|---|
| दहावी | ८०% |
| बारावी | ७५% |
| – विज्ञान (वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| वाणिज्य | ७०% |
| कला | ६५% |
| पदवी व सरकारमान्य डिप्लोमा | ६०% |
| एम.ए.एम.कॉम., एम.एस्सी. पीएच.डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस्, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी | उत्तीर्ण |
| परदेशांत घेतलेली पदवी | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जाचा विचार करील.

**अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ११ ऑक्टोबर २०२५**

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर, **Email** व संपूर्ण पत्ता **The NKGSB Ind & Education Society Laxmi Sadan, 361, V. P. Road, Mumbai - 400 004** या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

* विद्यार्थ्याच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबद्ध असणाऱ्या पाहिजेत.
* बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी बी.बी.एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
* ज्या डॉक्टर्सनी एम.एस. किंवा एम.डी.साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.
* गेल्या वर्षी काही परीक्षांचा निकाल उशीरा लागला होता. तेव्हा संबंधित गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनीही अर्ज पाठवावे.



A name that spells its class !
**WINOVER CATERERS**
**Marriages, Thread Ceremonies, Engagement and Birthday Parties Etc.**
**WE DELIVER FOOD / SNACKS FOR PARTIES AT HOME**
**Take away and TIFFINS Or opt for Ala-carte**
**Amchi food and Variety cuisines**
ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR
**Call or Whatsapp for our take away menu**
**Vinod Kaval / Ashwini / Rupali**
**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**
Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road, Vile Parle East, Mumbai - 400 057

## – : ठाणे मंच आयोजित पाक कला स्पर्धा २०२५ : –

रविवार ४ मे २०२५. तेंडुलकर सभागृह, माहीम.
वरील स्पर्धा महिलांनी दिलेल्या प्रतिसादामुळे उत्तमपणे पार पडली. दहा स्पर्धक होते. तसेच घरगुती पदार्थ व शाकाहारी पदार्थ घरून करून स्पर्धेसाठी आणावयाचा ही एकच अट होती.
येणाऱ्या लोकांसाठी २ बसेसची व्यवस्था जोगेश्वरी व ठाण्याहून केली होती. जोगेश्वरी बसची व्यवस्था प्रदीप दाभोळकर बघत होते व ठाण्याची बस व्यवस्था श्री. सुरेश पालेकर. त्या दोघांचे आभार.
हॉलमध्ये जवळ जवळ ७५ लोक होते. हॉलमध्ये पोहोचल्यावर गरमागरम चहा व बटाटावड्याने स्वागत झाले. फ्रेश वाटले. टेबलावर दहा महिलांनी त्यांचे खाद्य पदार्थ मांडले त्यांची नावे व पदार्थ खालीलप्रमाणे :
(१) शांता पालेकर–कलींगड डोसा व लसूण चटणी. (२) चित्रा थळी– पोहा उत्तपम
(३) प्रज्ञा वागळे – ज्वारीची भाकरी सोबत खोबऱ्याची चटणी.
(४) बिना दाभोळकर – तीन डाळींचा इडली पिझ्झा. (५) सुचेता सोहोनी – इडली झुका झुक.
(६) उमा वागळे – केळीच्या पानावरची भाकरी. (७) स्मीता रेगे – धोंडस
(८) प्रिया थळी – बटाट्याचे थालीपीठ. (९) सान्वी थळी– पोळी दाबेली
(१०) अंजली बोरकर – मुग डाळीचे अप्पे व चटणी
परीक्षक म्हणून (१) माधवी कसबेकर पाकशास्त्रनिपुण (२) गौरीश स्थळेकर शेफ, हॉटेल कोहिनूर कॉंटीनेन्टल, अंधेरी यांची निवड केली होती. त्यांना धन्यवाद.
प्रथम ३ पारितोषिके :– पहिले बक्षीस 1st Prize cash (Rs. 2001/-)
दूसरे बक्षीस रोकड (Rs. 1501/-) /तिसरे बक्षीस रोकड (Rs. 1001/-).
परीक्षकांच्या निर्णयाप्रमाणे –प्रथम पारितोषक –शांता पालेकर द्वितीय पारितोषक–चित्रा थळी

तृतीय पारितोषक–प्रज्ञा वागळे. इतर सर्वांना (७ जणाना) उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ५०१/– कॅश देण्यात आले. त्यानंतर कराओके ट्रेकवर मराठी व हिंदी गाण्याचा कार्यक्रम फारच छान झाला व सर्व गायकांना बक्षिसे देण्यात आली.

(१) प्रिया थळी–माय भवानी तुझे लेकरू. (२) विजय वागळे–शिटीवरचे गाणे– तेरी आँखोके सिवा.
(३) लिलाधर सलगर–मेरी जान मुंबईवरचा पोवाडा. (४) वसुधा कामत–तुला पहाते रे.
(५) प्रदीप दाभोळकर–एक लडकी भिगी भागीसी. (६) गौरीश व कविता सलगर – एक मै एक तू.
(७) प्रज्ञा वागळे –आयेगा आयेगा आनेवाला (८) तेजीश्री कुलकर्णी – अजीब दास्ता है ये
(९) मेधा सोहोनी–आवो ना गले लगाओ ना (१०)सुचेता सोहोनी–ओस ओ सजना बरखा बहार आयी
(११) डॉ. पूनम दाभोलकर–अधीर मन झाले. (१२) ज्योती सुखठणकर–नयनोमे बदरा छाये.
(१३) जयश्री तेलंग – आगे भी जाने ना तू. (१४) प्रसाद कसबेकर–किसी की मुस्कुराहटो पे हो निसार

एकंदरीत गाण्याचा कार्यक्रम फारच उत्तम झाला. लोकांनी टाळ्या वाजवून दाद दिली.

वसुधा कामत व प्रकाश तेलंग ह्यांनी ठाणे मंचला देणग्या दिल्या. टाळ्या वाजवून प्रेक्षकांनी त्यांचे कौतुक केले. श्री सुरेश पालेकर यांनी सप्टेंबर महिन्यात ३ दिवस २ रात्री Picnic बद्दल विचार मंडला. तसंच महिलांना श्रावणातल्या स्नेहमेळाव्यास येण्याचे आवाहन केले. घरी जाताना अल्पोपहार बॉक्स घेऊन मंच आयोजित बसमधून सर्व स्वगृही परतले. कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्वश्री राजेश दिवेकर, गिरीश रेगे सुरेश पालेकर व प्रदीप दाभोलकर यांनी खूप मेहनत घेतली. त्याबद्दल ह्या ठाणे मंच कार्यकर्त्यांचे अभिनंदन. असेच नवनवीन कार्यक्रम ठाणे मंचातर्फे सादर होऊ देत ही ईश्वरचरणी प्रार्थना.

उमाकांत का. पालेकर. - Mob. 8108296912



कारोवके वर भाग घेतलेले कलाकार व ठाणे मंचचे सभासद



पाक कलेतील दहा स्पर्धक, ठाणे मंचचे सभासद व स्पर्धेचे दोन्ही परिक्षक



पाक कला स्पर्धेमथील खास पदार्थांच्या डिशेस.



## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफीस, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.


**SERVICE FIRST®**

98193 04599 | 99204 04599

SOCIETY SERVICE RESOURCE
समाजसेवा समृद्धि

**सर्वप्रथम सेवा®**

**SOCIETY SERVICE RESOURCE**

# Hearty Congratulations




**Dr. Satish Vaman Wagh**
Whole time Director &
Executive Chairman of
Supriya Life science Ltd.
who got feliciated
at
Bombay Stock Exchange
on
31st May 2025.



# SHREE HOMOEPATHIC PHARMACY

**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) ,**
**Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**


अरुण भास्कर कसबेकर यांच्या " **कवडसे मनाचे** " ह्या पुस्तकाला वाचकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. तरी अजून ज्यांना हे पुस्तक विकत घ्यावयाचे असेल त्यांनी NKGSB SANGH च्या Office मध्ये संपर्क साधावा.
ऑफीस फोन नंबर मुखपत्रिकेच्या कव्हर पेजवर दिला आहे. धन्यवाद.




**ठाणे मंच**

दिनांक १७ ते १९ सप्टेंबर ५ (३ दिवस २ रात्री) कोकणात दापोली येथे जायचे ठरवले आहे. पितांबरी ॲग्रो ट्युरिझम् ह्या ब्रँडेड कंपनीचे रिसोर्ट निवडले आहे. आकार प्रत्येकी रुपये १०८००/- (वाटाघाटीत पैसे कमी झाल्मास रिफंड दिला जाईल) बस प्रवास थांबा धरुन साडेसात तास. मर्यादित जागा. प्रथम पैसे भरणाऱ्यास प्राधान्य.पैसे नेहमीप्रमाणे

NKGSB Bank, Naupada,Thane -
SB account 020100100001816 मध्ये भरावे.

संपर्क :
सुरेश पालेकर ८९२८८५०१९३. राजेश दिवेकर ९६१९३६२४६०
गिरीश रेगे ९९२२१६८७२५.



**Tiyan Parag Pai**

**Scored 98.6% in 10th ICSE Board exams** 2025.
He scored a perfect 100% in Maths and Biology.
School Name: Children's Academy, Ashok Nagar, Mumbai.
Mother's Name: Vrinda Pai
Father's Name: Parag Pai
Grand ma-pa - Madhuri - Mahesh Pai
Meera Nishith Prabhu Verlekar

चुकीची दुरुस्ती : १) गेल्या अंकातील वरद गिरिष पिंगे पान २५ वर एप्रिल ते जून २५ वाङ्‌निश्चय मध्ये अंतरा मोने ऐवजी अंतरा कात्रे असे चुकीचे देण्यात आले होते. तरी वाचकांनी नोंद घ्यावी.

– संपादक

ऑल इंडीया सारस्वत कल्चरल ऑर्गनायझेशन प्रस्तुत

**" प्रेझेन्ट अॅन्ड फ्यूचर ऑफ को-ऑपरेटिव्ह बँक्स"**



From left standing CA Prasanna Rege, Gautam Thakur-Chairman Saraswat Bank, Mr. Arun Mavinkurve Vice-Chairman SVC Bank and CA Himangee Nadkarni Chairperson, NKGSB Bank.

**हा कार्यक्रम पारले येथे २६ एप्रिल २०२५ रोजी पार पडला.**

**॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥**

**आमची लाडकी आई**

**कै. उमा म. पालेकर**



यांना **मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५** रोजी देवाज्ञा झाली,
आम्हा सर्वांकडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.
त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

**शोकाकुल**

**अनिल पालेकर आणि परिवार**

**महेश्वरी इनामदार आणि परिवार**



# श्रद्धांजली

## Mohan Shantaram Kasbekar

**Our Beloved Pappa**

***पुण्यतिथी***

**कै. मोहन शांताराम कसबेकर**



पाहता तुझला देवा पाहणे संपले
पाहुनिया डोळेभरी मन तृप्त झाले.

**ह्या २८ ऑगस्ट रोजी ऋषिपंचमीला इहलोक त्यागून ५३ वर्षे पूर्ण होत आहेत.**

**देहावसान :** ऋषि पंचमी (भाद्रपद शुद्ध पंचमी)

**दिनांक १२ सप्टेंबर १९७२**

(आम्हां सर्वांना तुझी आठवण येत नाही असा एकही दिवस जात नाही)

**-प्रसाद मोहन कसबेकर कुटुंब**

**संध्या विलास सोहोनी कुटुंब**

**नवनीत मोहन कसबेकर कुटुंब**




NKGSB Bank had received Gold award from Infosys in Center of **Excellence Catagory.** Around 300 + Banks were participated all over India.

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या (मागील अंकानंतर ) उल्लेखनीय देणग्या

### १) श्रीमती शैलजा पांडुरंग नाडकर्णी यांच्या तर्फे दोन लाख रुपयांची देणगी

पुणे येथील श्रीमती शैलजा पांडुरंग (आपा) नाडकर्णी यांनी अलीकडेच २ लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील १ लाख रुपये सासूसासरे श्रीमती पार्वतीबाई व श्री. गणपत पांडुरंग नाडकर्णी (शुकमास्तरांच्या सदाशिवगड हायस्कूलचे गणपत मास्तर) यांच्या स्मरणार्थ वृद्धसेवेसाठी आहेत तर उर्वरीत एक लाख रुपये पती श्री पांडुरंग गणपत नाडकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

### २) डॉ. प्रेमानंद देसाई यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीसाठी एक लाख रुपयाची देणगी.

वरळी येथे राहणारे डॉ. प्रेमानंद दुर्गाराव देसाई हे औषध निर्मिती क्षेत्रात तज्ञ होते. त्याच विषयात त्यांनी डॉक्टरेट मिळविली होती. २०२३ साली त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पुण्यतिथी प्रसंगी त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती सुधा यांनी एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

***



## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री माधव रामदास नायक यांच्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती मानसी अजित नायक यांजकडून | १,५०० |
| २. | श्री देविदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | १०,००० |
| ३. | श्रीमती शामला व श्री. वासुदेव जनार्दन कामत यांच्या स्मरणार्थ कामत कुटुंबीयांकडून | २५,००० |
| ४. | श्री. महेश वासुदेव कामत यांच्या स्मरणार्थ कामत कुटुंबीयांकडून | २५,००० |
| ५. | श्री. गुरुनाथ दीनानाथ वर्टी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. विवेक यांजकडून | १,००० |
| ६. | श्री. सदानंद गणपत नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ अनामिकाकडून | १,००१ |
| ७. | श्री.अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शामला यांजकडून | ५,००१ |
| ८. | श्रीमती गंगाबाई व श्री. काशिनाथ त्रिंबक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ नाडकर्णी कुटुंबीयांकडून | ५,००१ |
| ९. | श्री.सदिच्छानंद नागेश नाडकर्णी यांच्या २९ व्या पुण्यतिथी स्मरणार्थ नात कु.सुदिप्ता आणि अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५,००० |

### ठाणे मंचास मिळालेल्या देणग्या

| | | | |
|---|---|---|---|
| १. | हेमांगीनी दत्तप्रसाद कुलकर्णी – जोगेश्वरी | – | ७,००० |
| २. | उमाकांत काशीनाथ पालेकर – जोगेश्वरी | – | ५,००० |
| ३. | वसुधा व्यंकटेश कामत – जोगेश्वरी | – | २,५०० |
| ४. | प्रकाश मधुकर तेलंग – जोगेश्वरी | – | ५,००० |

## वृद्ध सेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. विश्वनाथ नागेश नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी बंधु श्री. दत्तात्रेय यांजकडून | १०००० |
| २. | श्रीमती जयश्री सतीश कसबेकर यांच्या स्मरणार्थ पती श्री. सतीश वसंत कसबेकर यांजकडून | ११,००० |
| ३. | श्री. कमलाकर यशवंत तेलंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती सुरेखा (सुमन) यांजकडून | ५,००० |
| ४. | सासुसासरे श्रीमती पार्वतीबाई व श्री गणपत पांडुरंग नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती शैला पांडुरंग नाडकर्णी यांजकडून | १,००,००० |
| ५. | श्रीमती विमल व श्री. गजानन सीताराम बोरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र सर्वश्री सीताराम व दीपक यांजकडून | १०,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. प्रेमानंद दुर्गाराव देसाई याच्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती सुधा यांजकडून | १,००,००० |
| २. | श्री. पांडुरंग गणपत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शैला यांजकडून | १,००,००० |
| ३. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या १६ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. अजित यांजकडून | २,००१ |
| ४. | श्रीमती सुहास व श्री. अरविंद महारुद्र कसबेकर यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती साधना पी. निर्मल व पत्नी शर्मिला अरविंद कसबेकर यांजकडून | ३०,००० |
| ५. | श्रीमती जयश्री सतीश कसबेकर यांच्या स्मरणार्थ पती श्री. सतीश व कन्या श्रीमती शांभवी यांजकडून | ११,००० |
| ६. | श्री. अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती विद्या व जांवई श्री. मनोज गोविंद भांडारकर यांजकडून | ५,००१ |



## ।। कालाय तस्मैः नमः ।।

| | नाव | गाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | शैलजा सतीश गायतोंडे (पूर्वाश्रमीची शैलजा विठ्ठल वागळे) | हाणकोण | पारले |
| २. | अरविंद महारुद्र कसबेकर | कडवाड | माहीम |
| ३. | शशीकला घन:श्याम करूर (पूर्वाश्रमीच्या शशीकला सोना वागळे) | शिरसी | वांद्रे |
| ४. | शांताबाई विष्णू कुलकर्णी | किन्नर | कारवार |
| ५. | श्यामल मधुसूदन मुझूमदार | अंकोला | वांद्रे |
| ६. | दिलीप रामचंद्र नाईक | अंकोला | वांद्रे |
| ७. | जगदीश मारुती नाडकर्णी | सांवर पै | माहीम |
| ८. | गुरुदास दत्तात्रय नाडकर्णी | हाणकोण | इरला |
| ९. | अनुसुया अनंत नाडकर्णी | अंकोला | अमेरिका |
| १०. | उमा मंगेश पालेकर | कडवाड | कांदीवली |
| ११. | निलेश उमाकांत पालेकर | बाड | अंधेरी |
| १२. | संदीप विठ्ठल सबनीस | कारवार | माहीम |
| १३. | विश्वनाथ विठ्ठल वागळे | हाणकोण | माहीम |
| १४. | किशोर वासुदेव सबनीस | कारवार | ठाणे |
| १५. | दीपक दिगंबर नाडकर्णी | बासुंगे | गोवा |
| १६. | अनुराधा अरुण वागळे | माजाळी | वाळकेश्वर |
| १७. | सुब्राव अच्युत गायतोंडे | कासरकोड | बोरीवली |
| १८. | लता पुरूषोत्तम वागळे | हाणकोण | अमेरिका |
| १९. | अंजली अविनाश वाघ | सदाशिवगड | बोरिवली |
| २०. | स्मिता अजित वर्टी | सदाशिवगड | वरळी |
| २१. | अरूण विश्वनाथ तेलंग | हळदीपूर | ठाणे |

# श्रद्धांजली

**कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी (सांवरपै)**

४० वे पुण्यस्मरण - निधन : रविवार२८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणीशिवाय गेल्या ४० वर्षात एकही दिवस गेला नाही. श्री मंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम.

**कै. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी यांच्या तर्फे**

Place : ____________

Date : ____________

The Chairman,
The North Kanara G.S. B Sangh,

Laxmi Sadan, 361, Vithalbhai Patel Road, Mumbai 400 004.

(Direct/ Through____________)

Dear Sir,

1. I/ We wish to donate an amount of Rs _________ (Rupees ________________ _________________________________________________) to the Sangh, and remit the amount herewith in cash/ by cheque* No _______ dated ________ of _____________________________(Bank) ______________(Branch) towards [2] or [3] ticked below

2. ☐ Please treat this amount as my /our Endowment to CORPUS FUND of the Sangh, This donation be treated as an Endowment on the occasion of ______________ ______________________________________________________

to commemorate the memory of my /our _________________________

Late Shri/ Smt ______________________________________________

From _________________________________________________

Note - Amounts less than Rs. 5,000 /- will be accepted as a donations.

General Assistance Fund ☐ Donation ☐

Vrudh Seva Fund ☐

The yield from the investment of which be utilised for charitable and other purposes as per the objects of the Sangh.

OR

3. ☐ Please treat this as a general donation to be utilised as per the objects of the Sangh at the discretion of the committee of the Sangh.
Kindly Acknowledge and forward me/us your receipt.

Full name and complete residential address of the donor/s
(Please use CAPITAL letters only )

Yours truly

Shri/ Smt ________________________

________________________________

Signature of the donor/s

________________________________

_______________Pin ☐☐☐☐☐☐

Tel: (Resi)______________Mobile ______________

Off ___________________ Pan No ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

(FOR OFFICE USE ONLY )

Acknowledged with thanks in the Managing Committee's Meeting held on ___________

Received on __________

Receipt No: __________


Date : ____________

Chairman

Cheque should be drawn in favour of "N.K.G.S.B Sangh " Note : For (2) above, the amount has to be 1,000/- minimum. For (3) above, any amount can be given.



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.